नि.फौ.ख.क्र. ७५/२०१९

सरकार –वि– वजीरोद्दीन व इतर

नि.क्र. ५९

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — अफरोज खान सरदराज खान,

वय. ३० वर्षे, व्यवसाय — मजुरी,

राहणार — माटरगाव खुर्द, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

दि. २८.११.२०१८ रोजी माझ्या समक्ष ग्राम कोक्ता येथे घटनास्थळ पंचनामा झाला नव्हता. त्यादिवशी माझ्या समक्ष कुठलाही जप्ती पंचनामा झाला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. २ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता नि.क्र. ६० देण्यात येते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. २ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता नि.क्र. ६१ देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.११.२०१८ रोजी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझ्या समक्ष एक टाटा ४०७ व दोन ब्रास रेती जप्त करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविण्यात आला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस दुसरा पंच जितेंद्रसिंग राजपुत होता. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पंचनामे पोलीस हवालदार चव्हाण यांनी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो व आरोपीच्या सांगण्यावरुन त्याला शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस. जी. वानखडे, वकील यांनी नाकारला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०६.१०.२०२५ | दि.०६.१०.२०२५ |